**-:प्रेस नोट:-** दिनांक १९/१०/२०२६

**<u>माटुंगा पोलीस ठाणे यांनी वडाळा चार रोड गोळीबार प्रकरणी आरोपी अटक करुन गुन्हा उघडकीस आणलेबाबत</u>**

दि. १७/१०/२०२६ रोजी रात्री ०९:१५ ते ०९:४५ वा. च्या सुमारास आलीशान हॉटेल, आर.ए.के. चार रोड, वडाळा, मुंबई या ठिकाणी दोन अनोळखी इसमांनी पूर्वीच्या रागाचे कारण मनात धरून, फिर्यादी यांच्यावर गोळीबार केला होता, सदर घटनेबाबत गु.र.क्र. ३२१/२०२६ कलम १०९(१), ३५१(४), ३५२, ३(५) सह ३, २५, २७ शस्त्र अधिनियम सह कलम ७ फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम १९३२ प्रमाणे दि. १८/१०/२०२६ रोजी ०४:२८ वा. गुन्हा दाखल करण्यात आला होता. .

सदरचा गुन्हा हा संवेदनशील स्वरूपाचा असल्याने, मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ स्तरावर विविध पोलिस पथक तयार करून, फिर्यादी यांनी आरोपी बाबत दिलेल्या प्राथमिक माहिती नुसार सर्व पोलिस पथकांना पाहिजे आरोपी बाबत माहिती देऊन रवाना करण्यात आले. तांत्रिक कौशल्याचा वापर करत, पाहिजे आरोपी हे वडाळा, पोलिस ठाणे हद्दीत असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी पथके रवाना करण्यात आली व सापळा लावून वडाळा पोलिस ठाणे हद्दीतील झोपडपट्टी परिसरात शिताफीने खालील ०२ आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

**१) मोहम्मद अली वकील अहमद खान वय-२२ वर्षे, धंदा:- मजूरी, रा.ठि.:- गेट नं. ०४, नुराणी मस्जिद, बंगाली पूरा, ॲन्टॉप हिल, वडाळा, मुंबई**

**२) हमजा वकील अहमद खान वय-१८ वर्षे, धंदा:- मजूरी, रा.ठि.:- गेट नं. ०४, नुराणी मस्जिद, बंगाली पूरा, ॲन्टॉप हिल, वडाळा, मुंबई**

सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.नि. प्रतिभा जोगळेकर करत आहेत.

सदरची उत्कृष्ट कामगिरी मा.पोलीस आयुक्त, श्री.देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. मनोजकुमार शर्मा (का व सु), अप्पर पोलीस आयुक्त श्री. विक्रम देशमाने (मध्य प्रादेशिक विभाग ), पोलीस उप आयुक्त श्री अनुराग जैन (मध्य परिमंडळ २), सहा.पोलीस आयुक्त श्रीमती माधुरी पाटील (माटुंगा विभाग), यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश वाघमारे, यांच्या सूचनांनुसार पोलिस निरीक्षक (गुन्हे) प्रतिभा जोगळेकर, पोलिस निरीक्षक (का व सु) अनंत कांबळे, पोलिस निरीक्षक(प्रशासन) राकेश गवळी, सपोनि. दिनकर कदम, पो.उप.नि. प्रकाश बोर्डे, पो.उप.नि. प्रविणकुमार पाटील, पो.उप.नि. टिपूसुलतान शेख, पो.उप.नि. केदार उमाटे (ॲन्टॉप हिल पोलिस ठाणे), पो.उप.नि. गौरव शिंदे (ॲन्टॉप हिल पोलिस ठाणे), पोह आनंद ताबे, पो.शि महेश नेहारे, पो.शि. मारुती कुंभार (वडाळा पोलिस ठाणे) पो.शि. विवेक कांबळे ( वडाळा पोलिस ठाणे) यांनी पार पाडली आहे.